# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 10/12/2014 (का.प.क्र.08) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 10 डिसेंबर 2014 रोजी (का.प.क्र .08 ) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.10 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
03. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
05. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
06. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
07. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
08. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
09. स.स.सौ.सत्यभामा दामोधर शिंदे
10. स.स.सौ.ऊर्मिला नितीन चित्ते
11. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

<u>चर्चा :</u>

श्री.काशिनाथ कोकाटे :महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री.ए आर अंतुले यांचे नुकतेच निधन झाले ते मुख्यमंत्री असतांना ते अनेक गोरगरीब जनता व आर्थीक दुर्बल घटकातील जनतेशी निगडीत होते संजय गाधी निराधार योजना असेल,शेतक-यांचा कर्ज माफीचा विषय असेल ते सोडविण्याचे त्यांनी काम केले. औरंगाबादला उच्च न्यायालयाची स्थापना त्यांचेच कार्यकाळात झालेली आहे .तसेच हिगोंली, लातूर, जालना ,जिल्हयाची नव्याने निर्मिती त्यांचे कार्यकाळात झाली,अनेक विभागीय स्तरावरील कामे त्यांचे कार्यकाळात महाराष्ट्रात झाली.धडाडीचे मुख्यमंत्री म्हणुन ते नावलौकिक होते.त्यांचे दु:खद निधनाबध्दल सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्रीमती प्रिती तोतला :श्रध्दाजंली देण्या बाबत सुचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.मीर हिदायत अली :स.श्री.कोकाटे काशिनाथ यांनी जी सुचना मांडली त्यास अनुमोदन आहे.

मा.सभापती :ठिक आहे श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

या वेळी ए.आर अंतुले यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.काशिनाथ कोकाटे :ज्या विषयावरून सभा स्थगित करावी लागली होती ते रिलायन्स व इतर कंपनीने दिलेले 40 कोटी कुठे खर्च केले यावर अगोदर चर्चा व्हावी.

श्रीमती प्रिती तोतला :40 कोटीचा विषयही महत्वाचा आहे, फाटा फोडण्याचा विषय नाहीपरंतु वार्डात साधे देखभाल दुरूस्तीची सुध्दा कामे होत नाही माझ्या वार्डात लाईट बंद आहे.वसंतभुवन येथे दारूचे दुकान आहे. महिलांना पाणी भरण्यासाठी बाहेर यावे लागते 70-75 लाईट बंद आहे. हे जाणून बूजून कार्यवाही होत नाही असे माझे मत आहे. अगोदर सेना तर्फे आता भाजपा तर्फे मांडते म्हणून कामे होत नाही.

उपअभियंता(श्री.बनसोडे):ठेकेदारांना पेमेन्ट न दिल्यामुळे काम थांबले होते,त्यांचे काही महिण्याचे पेमेंन्ट आता दिले. काम सुरू केले. या भागात लाईटची तपासणी केली 40-45 लाईट बंद आहे.बीओटी वर असलेले लाईट या भागातील चालू केले.

श्रीमती प्रिती तोतला :काम चालू नाही. कामाची सुरूवात झाली असेल तर अशावेळी वार्डातील स.सदस्यांना कल्पना का दिली जात नाही. औषध फवारणी व धूर फवारणी होत नाही.आज सभा असल्याने सकाळीच फवारणी करणारे आले. लाईट केंव्हा चालू होणार हे उत्तर अपेक्षीत आहे.

उपअभियंता(श्री.बनसोडे):02 दवसात या भागातील व शहरातील सर्वच लाईट चालू होतील.

श्री.मीर हिदायत अली :लाड समितीच्या निकषानुसार दिं.17-7-2014 रोजी काही कर्मचारी यांना नियुक्त्या दिल्या ते नियमानुसार बसतात का? एक वर्षात 218 कर्मचारी नेमले.यात मोठे रॅकेट महापालिकेत काम करीत आहे. ज्यांची सेवा 20 वर्ष झाली त्यांना समजावून सांगतात स्वेच्छानिवृत्ती घ्यायला लावतात.त्यांना अपत्य नसते कुणीही त्यांचे वारस दाखवितात.शपत पत्र बॉण्डवर तयार करून त्या व्यक्तीला नौकरी देतात.उदा.सोनू रामकुमार घुसरे हे लाड समितीच्या निकषानुसार नोकरीस पात्र आहे का? अशी अनेक प्रकरणे आहेत.

आस्थापना अधिकारी-1 :15 दिवसापुर्वी मी या विभागात रूजू झालेलो आहे. माझे कडून असे प्रकरण झालेले नाही. तपासणी करून योग्य कार्यवाही होईल.

श्री.मीर हिदायत अली : दिं 17-7-2014 ला संबधीतास आदेश दिले ते लाड समितीच्या निकषानुसार पात्र आहेत का? संचिका मागवून घ्यावी, एक वर्षात 218 लोकांना नोकरीवर घेतले. यादी माझ्याकडे आहे यामागे मोठे रॅकेट आहे. बाहेरच्या बाहेर 8 ते 10 लक्ष रूपये घेवून सेटींग करतात बॉण्डवर लिहून आणतात त्या अधारे नोकरीवर घेवून टाकतात. श्री.सोनू रामकुमार घुसरे यांना लाड समितीच्या निकषानुसार नियुक्ती दिली का? माहिती घ्यावी.

श्री.अनिल जैस्वाल :स्मशानभुमी,कब्रस्तान मध्ये अत्यंविधीसाठी महापालिका खर्च करीत असे, स्मशान जोगी सांगतात आम्हाला पैसे मिळत नाही ज्यांचे निधन झाले त्यांचे नातेवाइकांनी खर्च पेड करावा.

श्री.मीर हिदायत अली :कब्रस्तान व स्मशानभुमीसाठी तरतुद ठेवण्याचा ठराव घेतला परंतु कब्रस्तानसाठी तरतुद नाही स्मशानभुमीसाठी 1 कोटी ठेवले.कब्रस्तानमध्ये वॉचमन व इतर सुविधासाठी तरतुद ठेवावी.जो व्यक्ती खर्च करू शकत नाही अशांना लाभ मिळावा.कितीं लोकांचा मृत्यू झाला किती पैसे जमा केले.1 लक्ष जमा झाले 1.25 कोटी खर्च केले यात गरीब लोकांबरोबर श्रीमंत लोक फायदा घेत आहे.

श्री.अनिल जैस्वाल :40 कोटीचे रस्त्याची कामे दिली कामे होत नाही.अत्यंविधीचा खर्च का बंद करीत आहे..हा विषय मार्गी लावावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :अत्यंविधीसाठी लागणारा खर्च मोफत देण्याचा सर्वसाधारण सभेने धोरणात्मक निर्णय झाला.त्यानुसार एक वर्ष अमलबजावणी केली. एका वर्षात 1.22 कोटी खर्च झ ाले.700 कोटीच्या बजेटमधून दीड दोन कोटी या कामासाठी खर्च होत असेल तर मोठी रक्कम नाही.पॉलीसी निर्णय सभेने घेतला त्यावर गदा आणण्याचा कुणाला अधिकार नाही.प्रशासनाला सुध्दा नाही जर अत्यंविधीचा खर्च बंद करण्याचे परीपत्रक प्रशासन काढत असेल तर सभागृहाचा अवमान आहे. तसे परीपत्रक काढलेले आहे का, कुणाच्या सहिने आदेशीत केले आहे अत्यंविधी साठीचा खर्च बंद करावयाचा असेल तर तसा प्रस्ताव पुन्हा सभागृहासमोर आणावा लागेल.

आरोग्य वैद्य.अधिकारी : स्मशानजोगी या संदर्भातातील संचिका आठ दिवसापुर्वी 7 लक्षचे बील मंजुरीसाठी विभागात आली होती ती संचिका मंजूरी होऊन लेखा विभागामार्फत मा.आयुक्ताकडे गेली आहे.

श्री.अनिल जैस्वाल :किती बील आहे.

आरोग्य वैद्य.अधिकारी : एकूण 11 लक्षचे बील दाखविले होते.यापुर्वी संचिका सादर होती ती आलेली नाही. त्यापैकी 5 लक्ष रू. द्यावे असे होते.

मा.सभापती :ही स्कीम चालू आहे की बंद केली.पत्र काढले का ?

आरोग्य वैद्य.अधिकारी :विद्युत दाहिनीचा वापर करण्यासाठी जनजागृण करावे असे म्हटलेले आहे. स्कीम बंद करण्या बाबत कोठे ही म्हटलेले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :ही योजना बंद होऊ नये यासाठी स.सभापती, व काही पदाधिकारी मा.आयुक्ताकडे गेले होते नक्की काय हालचाली सुरू आहे संपुर्ण खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी :ही योजना बंद करावी असे मा.आयुक्तांनी म्हटले नाही. त्यात काही बदल करावयाचे असेल तर प्रस्ताव करावा असे म्हटले.संचिका मागविली आहे वाचून खुलासा दिला जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :ही योजना बंद करणार असेल तर हा सर्वसाधारण सभेचा अवमान आहे.

श्री.मीर हिदायत अली :स्मशानभुमीसाठी 1.50 कोटीची तरतुद,परंतु कब्रस्तान साठी तरतुद केली नाही कब्रस्तान मध्ये वॉचमन व इतर खर्चासाठी तरतूद असावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :कब्रस्तान, ख्रिश्चन भुमी येथे वॉचमन ठेवावे,ठराव घेतलेला आहे. भेदभाव होऊ नये.आस्थापना विभागाने कार्यवाही करावी.

श्री.मीर हिदायत अली :40 कब्रस्तान आहे, 10-12 ठिकाणी वॉचमन असतील यासाठी 4 लक्ष खर्च करू शकत नाही काय ?

श्री.जहागींर खान :कब्रस्तान साठीही अत्यविधीसाठी बजेट मध्ये तरतूद असावी. गरीबासाठी हे आवश्यक आहे.

मा.सभापती : कब्रस्तान, ख्रिश्चन स्मशान भुमी येथे वॉचमन व तेथील इतर खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतुद करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :कब्रस्तान मध्ये वॉचमन देण्या बाबत आस्थापना विभागाने कार्यवाही करावी.

श्री.अनिल जैस्वाल :सर्वसाधारण सभेने मंजूर केल्यानुसार कब्रस्तान असेल स्मशानभुमी असेल मोफत अत्यंविधी केला जाईल तसे बोर्ड सदर ठिकाणी लावण्यात यावे.संपर्कासाठी पावतीवर मोबाईल फोन नंबर बोर्ड वर द्यावा.

श्री.मीर हिदायत अली :ही योजना गरीबासाठी आहे यात श्रीमंत लोकही फायदा घेत आहे.त्यांचेकडुन खर्च घेतला पाहिजे.

श्रीमती फिरदोस फातेमा खानः स्मशानभुमी मध्ये अत्यंविधीसाठी साठी 1.50 कोटी खर्च होतो ही गरीबासाठी योजना आहे यात श्रीमंत फायदा घेत आहे. कब्रस्तानमध्ये वॉचमन दिले जात नाही.तसेच पंचशील बचत गटाच्या माध्यमातून बेवारस प्रेताची विल्लेवाट लावतात त्यासाठी त्यांना दर महिण्याला वेळेवर बील दिले जाते परंतु किती बेवारस व्यक्तीचा ते शोध घेतात माहिती द्यावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :मागिल बैठकीत जे प्रश्न उपस्थित केले त्यांचा खुलासा व्हावा.वार्डात औषध व धुर फवारणी होत नसल्यामूळे डेंग्यूची साथ मोठया प्रमाणात आहे.माझ्या मुलाला डेंग्यु झाला अधिकारी प्रत्यक्ष भेटले.कार्यवाही केली नाही. दोन कर्मचारी 6 वार्डात फवारणी करू शकतात का? स्वच्छतेवर लाखोचा खर्च होतो.गरीब नागरीक 7-8

दिवस दवाखान्यात ॲडमीट असेल तर त्यांना तेवढा खर्च झेपत नाही. सदस्यांच्या पाल्यास डेंग्यु होत असेल तर सामान्य नागरीकांचे प्रश्न सोडवणार काय अशी भावना झाली स्वच्छता व पाणी नागरीकांचा आवश्यक विषय आहे यावर निर्णय घ्यावा. नसता मी निषेध करते.

श्रीमती फिरदोस फातेमा खान : पंचशीाल बचत गटाच्या माध्यमातून दर महिण्याला किती बेवारस प्रेताची विल्हेवाट लावली जाते.याचा खुलासा घ्यावा तसेच प्रश्न उपस्थित केल्यानुंसार डेग्युंचा डास शुध्द पाण्यात अंडी घालतो.जे पिण्याचे पाणी असते.काही भागात 4-5 दिवसानंतर पाणी दिले जाते. या कालावधी डेंग्युचा डास अंडी घालून डासाची पैदास होते.त्यानंतर उशीराने होत असलेल्या फवारणीला अर्थ राहत नाही.स्वच्छ पाणी मिळावे तसेच साफसफाई होऊन कचरा उचलणे हे दोन्ही कामे वेळीच करावी.

श्रीमती प्रिती तोतला :अनेक डेंग्यूचे रूग्ण आढळतात.कचरा उचलतांना यापुर्वी वजन होत असे त्यामुळे असेल तो कचरा उचलून नेला जात असे, परंतु आता पुर्ण कचरा उचलला जात नाही.फॉगींग मशीन किती आहे.त्यांना किती औषध, डिझेल दिले जाते.ते कर्मचारी कीती वेळ काम करतात यावर कुणाचे नियत्रंण असते का ?सर्व माहिती द्यावी.

मा.सभापती :डेग्युंचा आजार होऊ नये यासाठी काय नियोजन केले माहिती दयावी.

श्री.संजय चौधरी :माझ्या वार्डात 10-12 कर्मचा-यांची टिम दिली चार फॉगींग मशीन दिल्या त्यातील दोन बंद होतात एका मशीनसाठी 4.50 लिटर डिझेल दिल्याचे सांगतात प्रत्यक्षात तेवढे नसते 30-40 घरे फवारणी होते नंतर मशीन बंद पडते.दोन महीने पुन्हा कॅम्प येत नाही अर्धवट फवारणी होते नागरीकांना याचा त्रास सहन करावा लागतो.

आरोग्य वैद्य.अधिकारी :जुन-जुलै दरम्यान भारतात डेंग्युचे साथ पसरली होती महाराष्ट्र क्र.1 वर औरंगाबादचा 3 रा क्र. होता. जुलै-ऑगस्ट मध्ये जास्त रूग्ण आढळून आले. त्यापरिस्थितीनुसार पुणे येथील सह संचालक जे मलेरिया व डेंग्यु या आजाराच्या संदर्भातील अधिकारी आहे यांनी डेंग्युच्या संदर्भात प्रत्येक घरातून सर्वेचे काम केले सॅम्पल 10 विभागाकडून करून घेतले त्यांचे निरीक्षण असे होते की 50 टक्के घरामध्ये डेग्युंच्या अळया आढळून आल्या.डेंग्युचा डास हा स्वच्छ पाण्यामध्ये अंडी टाकतो. नागरीकामध्ये पाणी साठविण्याची प्रवृत्ती वाढली आहे.प्रत्येक वेळी पाणी बदलले पाहिजे.साठवण जास्त दिवस असू नये अनेकदा नागरीकामध्ये जनजागृण केले आठवडयातून एकदा पाणी बदलले पाहिजे. पाणी येणार नाही म्हणून पाण्याचा उपसा कोणी करीत नाही.जुलै-ऑगस्ट मध्ये 02 वेळेस पुर्ण शहरात तपासणी केले यावेळी ॲबेट,टेनिफॉस जंतुनाशक औषध फवारणी केले.डासाच्या अळया कमी करण्यामध्ये यशस्वी झालेलो आहोत. 10 टक्के अजूनही काही भागात डेंग्यु डासाच्या अडया आढळून येत आहे. मा.आयुक्त यांनी अनेक भागात भेटी दिल्या. मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली डास नियंत्रण समिती स्थापन केली त्यात शहर अभियंता, पाणीपुरवठा अधिकारी,शहरातील एनजीओ व नामांकित डॉक्टर आहे. आयुक्तांनी सर्व सदस्यांच्या समवेत बैठक घेवून डास निर्मुलन व्हावे यासाठी सजेशन दिले की जे बायलॉजीकल कन्ट्रोल जे म्हणतो ते शहरामध्ये वाढविले पाहिजे कारण नियमीत औषध फवारणी करून डासांवर नियत्रंण करणे शेवटी ते केमीकल आहे त्याचा जास्त वापर केला तर आरोग्यास घातक होऊ शकते. जनजागृण सुरू केले.बायलॉज तयार करण्याची कार्यवाही सुरू केली.पुणे आणि

मुंबई महापालिकेच्या धरतीवर जेथे कमर्शियल वापर होतो अशा ठिकाणी निदर्शनास आले की ओव्हर हेडटँक, टायरची दुकाने ,बांधकाम या ठिकाणी जास्त प्रमाण आढळून आले तेथे स्वच्छ ठेवण्याची त्याची जबाबदारी आहे तसा बायलॉज तयार केले. येत्या सभेत ते मंजूरीसाठी ठेवणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :मनुष्यबळ कमी असल्यामूळे औषध फवारणी व साफसफाई होत नाही यासाठी काय प्रयत्न केले.

श्रीमती प्रिती तोतला :फॉगींग मशीन कुठे पाठविले. किती औषधी दिली कर्मचारी किती दिले याची नोंद ठेवली जाते का?

आरोग्य वैद्य.अधिकारी : डॉ.राणे यांना बायलॉजीस्ट म्हणून चार्ज दिलेला आहे सध्या आपल्याकडे शासनाचे अधिकारी आलेले नाही.

श्रीमती प्रिती तोतला :किती औषध दिले जाते.

जीवशास्त्रज्ञ :फवारणीसाठी मलेरिया विभागातील वार्डनिहाय एक कर्मचारी नेमून दिले. किती औषधी दिली जाते याची नोंद स्टोअरला घेतो.सकाळी 6 ते दुपारी 2 पर्यंत काम करावे अशा सुचना आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :माझ्या वार्डसह एकूण 6 वार्डसाठी 02 कर्मचारी औषध धुर फवारणी करतात 2 कर्मचारी सहा वार्डाची फवारणी करू शकतात का ?

श्रीमती फिरदोस खान :धूर फवारणी करणारे एजन्सी किती ,1 महिण्यात किती वेळेस फवारणी करायला पाहिजे.किती वेळेस केली जाते.

जीवशास्त्रज्ञ :वार्ड ब मध्ये -4 व ई मध्ये -2 एजन्सी काम करतात. गणेश पेस कन्ट्रोल नावाची एजन्सी काम करते

मा.सभापती :एजन्सी रेग्युलर आहे का?

जीवशास्त्रज्ञ : निविदा काढलेल्या आहेत प्रोसेस चालू आहे सध्या जुन्या एजन्सीकडुन काम करून घेत आहोत.

श्रीमती प्रिती तोतला :टेंडर काढावे. महत्वाचा विषय आहे वार्ड अ ड फ मध्ये कोणते कर्मचारी,एजन्सी काम करते.

जीवशास्त्रज्ञ :वार्ड अ ड फ मध्ये मलेरीया विभागाचे कर्मचारी काम करतात.ट्रॅक्टर फवारणीचे कर्मचारी आहे.

श्री.अनिल जैस्वाल :वार्डवाईज सक्षम अधिकारी नेमावे खाजगी एजन्सीचे लोक वाजवी पेक्षा जास्त पाणी टाकून फवारणी करतात.आलेले टेंडर ओपन करावे. जुन्या एजन्सीकडून काम करून घेऊ नये.

श्रीमती प्रिती तोतला : औषध प्रमाणाकानुसार फवारणी होते की नाही मलेरीया विभागाने क्रॉस तपासणी करायला पाहिजे.

आरोग्य वैद्य.अधिकारी : टेंडर ओपन केले जुनेच ठेकेदारांनी भरले.स्थायी समितीमध्ये त्यांना ब्लॅकलिस्ट करावे आदेश केले त्यांचेवर कार्यवाही नंतर टेंडरची कार्यवाही पुर्ण करता येईल.या एजन्सीला जानेवारी पासून पेमेंन्ट दिले नाही.

श्री.अनिल जैस्वाल :टेंडर ओपन करावे जुन्या एजन्सीला वगळून उर्वरीत एजन्सीमधून टेंडर अंतिम करावे.आरोग्य वैद्य.अधिकारी यांनी फोन केल्यानंतर सुध्दा एजन्सीचे लोक फवारणीसाठी येत नाही.

श्रीमती सत्यभामा शिंदे :ठेका दिला जातो .एजन्सी काम करीत नाही. अधिकारी एजन्सीचे नाव सांगतात. आम्ही कुणाकडे मागणी करायची.

श्रीमती फिरदोस फातेमा खान : औषध फवारणीचे काम चांगले व्हावे.साफसफाई व्हावी. टेंडर वगैरे काढणे, एजन्सी काम करीत नसेल तर कार्यवाही करणे हे प्रशासनाचे काम असते. जुने एजन्सीला लवकरात लवकर ब्लॅकलिस्ट करावे आठ दिवसात कार्यवाही करावी.प्रत्येक वार्डात केंव्हा फवारणी होणार कोणते कर्मचारी, कोणती एजन्सी काम करते या बाबत शेडयुल तयार करावे. स.सदस्यांना माहिती दयावी.केंद्रशासन देशात स्वच्छता अभियान राबविते.या शहरात ही स्वच्छता अभियान का राबविले जात नाही नुसते फोटो काढून कागदावर दाखविणे बरोबर नाही अमलबजावणी करावी.

मा.सभापती : वार्ड ब व ई मध्ये औषध फवारणी करणा-या खाजगी एजन्सीचे कामाची मुदत संपली आहे.मलेरिया विभागाने काम करावे. टेंडर प्रोसेसमध्ये आलेल्या एजन्सी ब्लॅकलिस्ट झालेल्या असेल तर त्यांना वगळावे व नव्याने टेंडर काढून टेंडर प्रक्रिया ताबडतोब सुरू करून कार्यवाही करावी.

श्रीमती प्रिती तोतला : वसंतभुवन, औरंगपूरा भाजी मंडई, शहागंज येथील बीओटीवर दिलेले प्रकल्प पुर्ण का झाले नाही. त्या ठिकाणी ड्रेनेजचे पाणी आहे.नागरीक मोर्चा आणतात.त्या ठिकाणी फळाची घाण , व इतर कचरा टाकला जातो.केंद्र शासन स्वच्छता अभियान राबवित आहे आपण किती जागृत आहोत.हे यावरून स्पष्ट होते,काम करण्याचा किती कालावधी दिला होता.केंव्हा काम सुरू होणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :बीओटीवर किती प्रोजेक्ट दिलेले आहे त्यांची मुदत काय, मुदतीत काम का केले नाही या जागेवरील किती उत्पन्न येत होते. शहागंज, वसंतभुवन, रेल्वेस्टेशन, औरंगपूरा भाजी मंडई,उस्मानपुरा,रॉक्सी सिमेना च्या बाजूची जागेवरील असे विविध प्राजेक्ट बीओटीवर दिले यातून मोठे उत्पन्न मिळेल असे अपेक्षीत होते परंतु एक ही प्रोजेक्ट पुर्ण झाला नाही.उत्पन्न येत नाही. टेंडर होते काम दिले जाते उदघाटन होते कोनशिला लावली जाते काम करून घेण्यासाठी पाठपुरावा होत नाही. रेल्वेस्टेशन येथील प्रोजेक्ट अंतीम टप्पयात आहे बाकीचे प्रोजेक्टचे काम पुर्ण नाही भोगवटा प्रमाणपत्र दिले का? किती उत्पन्न येत आहे.औरंगपूरा,शहागंज येथे गोरगरीब जनतेची दुकाने होती तेथील दुकानदारांना,खोटी आश्वासने देवून रस्त्यावर आणण्याचे पाप केले काम पुर्ण केले नाही.आता तेच लोक रस्त्यावर भाजीचे दुकान टाकुन बसलेले आहे रस्त्याची धूळ व अस्वच्छतेमूळे तेच मातीचे कन जंतू भाजीवर बसतात यामूळे नागरीकाच्या आरोग्यास धोका निर्माण झाला व याचा सर्वसामान्य नागरीकांना त्रास सहन करावा लागतो हे प्रोजेक्ट वेळेच्या आत का झाले नाही. खुलासा घेण्यात यावा.

श्री.मीर हिदायत अली :औरंगपूरा ,शहागंज येथील जागेवर बीओटीवर प्रोजेक्ट सुरू केले शहागंज भाजी मंडईत जवळपास 400 दुकाने होती त्या लोकांना रस्त्यावर आणले बीओटीवर काम करण्याचा कालावधी किती दिलेला होता व वेळेत काम न केल्याने काय कार्यवाही केली.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभियंता(बीओटी) :औरंगपूरा,शहागंज,शहानुरवाडी,रेल्वेस्टेशन येथील प्रोजक्ट बीओटीवर चालू आहे.औरंगपूरा येथे 32 दुकाने होती त्या दुकानदारांना पर्यायी जागा दयायची होती. त्यातील 26 लोकांना पर्यायी जागा दिली 6 दुकानदारांनी प्रोजेक्टवर स्थगिती आणली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.ज्या जागेवर खोदकाम केले.संबधीत 6 दुकानदारांशी चर्चा केली 13 तारखेला लोक अदालत आहे त्यात योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :सभागृहाची दिशाभुल करू नये,जागेचे पजेशन आल्यानंतर पीआर कार्ड तयार केल्यानंतरच प्रोजेक्ट राबवायला पाहिजे होता त्या लोकांना न्यायालयात जाण्याची संधी कुणी दिली.

कार्य.अभियंता(बीओटी) : औरंगपूरा येथील प्रोजेक्ट हाती घेतला तेंव्हा सर्व दुकानदारांचे पजेशन होते दुकाने व 140 ओटे आहे बाजूलाच सावित्रीबाई भाजी मार्केट मध्ये ते लोकांना शिप्ट केले.

मा.सभापती :औरंगपूरा भाजी मंडईच्या जागेवर घाण पाणी साचले ते का काढले जात नाही.

श्रीमती प्रिती तोतला : त्या जागेवर ड्रेनेजचे पाणी येऊन साचते.दखल घेतली जात नाही.

कार्य.अभियंता(बीओटी) :13 तारखेला लोक अदालत आहे सर्वच जागेचे पजेशन घेणार तेथील साफसफाई करण्यात येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :काम केंव्हा चालू होणार आहे ते सांगावे.

कार्य.अभियंता(बीओटी ) :10-15 दिवसाचा कालावधी लागणार आहे.50 वर्षापासून पजेशन आहे.

श्री.अनिल मकरीये :स्टे कशाबध्दल आलेला आहे. किती ठिकाणची कामे कुठपर्यत आली.

कार्य.अभियंता(बीओटी) :रेल्वेस्टेशन येथील काम पुर्ण झाले आहे वसंतभुवणचे काम प्रगतीपथावर, शहांगज येथील कामासाठी स्थगिती आदेश आहे,

श्री.जगदीश सिध्द :वसंतभुवनचे काम सुरू होऊन किती दिवत झाले प्रत्यक्ष सर्वे केला का? किती वेळ कामासाठी दिला.

कार्य.अभियंता(बीओटी) :9 महिण्यापासून काम सुरू आहे.ग्राऊड फ्लोअरचे काम आहे.रात्र-दिवस काम करू शकत नाही. येण्या जाण्यासाठी अडचण आहे.

श्री.जगदीश सिध्द :दोन वर्षाचा कालावधी दिला 9 महिण्यात एक स्लॅब टाकला आहे.आजच स्थायी समितीने स्थळ पाहणी करावी सत्यता समोर येईल ठेकेदार कोण ते काय काम करतात.तेथे अधिकारी पाहणी करीत नाही.जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी

मा.सभापती :सभा संपल्यानंतर स्थळ पाहणी केली जाईल.

कार्य.अभियंता(बीओटी) :सिध्दार्थ उद्यान मधील 5708 स्क्वेअर मी चे नियोजन सुरू आहे.पार्कीग चालू झाली अर्धा भागाचे बांधकाम चालू आहे. डीसी रूल प्रमाणे चेजेंस करीत आहेत. त्यानंतर उर्वरीत काम सुरू होणार आहे.पजेशन नंतर दीड वर्षाची मुंदत आहे महापालिकेच्या नियमानुसार प्रोसेस करून घेवून पुढील पार्ट बी चे पजेशन दिले आहे.

श्री.मीर हिदायत अली :महापालिका ज्या नाक्यावर रहदारी फिस वसुली करीत असे अशा नाक्याची जागा 30-30 वर्षापासून महापालिकेच्या ताब्यात आहे आजच्या वृत्तपत्रात आले की त्या जागेवर लोकांनी अतिक्रमण केले. 16-8-2014 रोजी रहदारी फिस वसुल करण्याचे रद्य झाले.त्यानंतर ती जागा मालमत्ता अधिकारी यांचेकडे हस्तांतर करायला पाहिजे होती तेथे सुरक्षा रक्षक नेमुन देवू शकत होतो.ती कार्यवाही केली नाही उलट डुप्लीकेट कागदपत्र तयार करून जागा बळकावण्याचे काम होत आहे अशा वेळी महापालिका प्रशासन काय करते.

मा.सभापती :नक्षत्रवाडी, व झाल्टा येथील नाके बंद झाले रहदारी फिस वसुली बंद केल्यानंतर ती जागा ताब्यात का घेतली नाही.

आस्थापना अधिकारी-1 :रहदारी फिस शासनाने 16 ऑगस्ट 2014 पासून बंद केले मालमत्ता विभागास रहदारी फि संकलन प्रमुखांनी पत्र दिले की सदरील नाक्याची जागा ताब्यात घ्यावी.

श्री.मीर हिदायत अली :महापालिकेची जागा होती सेक्युरीटी का नेमले नाही.

मालमत्ता अधिकारी :जकात नाक्या संदर्भात आस्थापना अधिकारी यांनी ऑगस्ट मध्ये पत्र दिले की जागा ताब्यात घ्यावी.प्रत्यक्षात ताबा दिला नाही.

मा.सभापती :पत्र दिल्यानंतर मालमत्ता अधिकारी यांनी किती जागा आहे कीती ताब्यात घ्यायची. प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली का ?

मालमत्ता अधिकारी :स्थळ पाहणी केली आहे तेथे बांधकाम केले नाही,बीड रोड व नक्षत्रवाडी येथे आपण केलेले तारफिंन्सींग आहे व त्याचे बाजूने दुसरे तारफिंन्सीग केलेले दिसुन आले.प्रशासकीय विभागालाही पत्र दिलेले होते त्यांनी कार्यवाही केली.

श्री.मीर हिदायत अली :महत्वाच्या जागा आहे. टेक्नीकल अधिकारी असुनही कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :जागा कुणाच्या ताब्यात आहे पे्परला बातम्या चुकीच्या आल्या का ?

मालमत्ता अधिकारी :जागा खुली आहे तेथे बांधकाम केलेले नाही. दोन ठिकाणी तारफेन्सिंग केल्याचे दिसून आले.

श्री.मकरीये अनिल :त्या जागेच्या संदर्भात पेपरला बातम्या आलेल्या आहेत.

मा.सभापती :बीड रोड झाल्टा, नक्षत्रवाडी येथील जागेची बैठक संपल्यानंतर पाहणी केली जाईल. जर जागेवर कुणी अतिक्रमण केले असेल तर संबधीत अधिकारी यांचेवर ताबडतोब कार्यवाही करावी आजच्या आज प्रशासकीय विभागाने ताबडतोब जागेवर असलेले अतिक्रमण काढावे ती जागा ताब्यात घ्यावी तेथे महापालिकेच्या नावाचे बोर्ड लावावे.

श्री.जहागीर खान :श्रीमती .मुमताज बेगम शेख युसूफ,यांनी बुढीलेन नेहरूभवन क्वार्टर व जागा मागितली होती त्याप्रमाणे दिंनाक 18-7-2013 च्या स्थायी समितीने ठराव मंजूर केला अदयापपर्यंत करारनामा का झाला नाही.

मालमत्ता अधिकारी :श्री.शेख युसूफ मयत कर्मचारी हे नेहरूभवन येथे क्वॅार्टरला राहत होते सन 2010 त्यांचे निधन झाले त्यानंतर त्यांचे कुटूंबीयांनी अर्ज केला की राहण्यासाठी जागा नाही त्यानुसार स्थायी समितीमध्ये ठराव घेवून त्यांना क्वॅार्टर व जागा लिजवर द्यायची असा ठराव घेतला एक हप्याची रक्कम भरणा केली चार हप्याची रक्कम भरण्यास मुदत मागीतली होती पुर्ण पैसे 3.60 लक्ष भरावयाचे होते त्यांनी 2.20 लक्ष रक्कम भरलेली आहे.

श्री.जहागींर खान :करारनामा करून दयावा ते पैसे भरण्यास तयार आहे.

मालमत्ता अधिकारी :सद्यस्थिती त्यावर स्टे आलेला आहे मा.न्यायालयात प्रकरण आहे.

श्री.मीर हिदायत अली :शहाबाजार आरोग्य केंद्रात पॅथॉलॉजी लॅब, ब्लड तपासणी मशीन सहा महिण्यापासून बंद आहे संबधीत आरोग्य अधिकारी यांनी 5-6 वेळेस आरोग्य विभागाला पत्रव्यवहार केला कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी :नवीन मशीनसाठी प्रस्तावित केले आहे. जुनी मशी्न दुरूस्तीला जास्त खर्च येत आहे.मी सुट्टीवर होते.आल्यावर कार्यवाही सुरू केली.

श्री.मीर हिदायत अली :आरोग्य अधिकारी 5-6 महिण्यापासून सतत पत्रव्यवहार करीत आहे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी काय पाठपुरावा केला.नवीन मशीन खरेदीची कार्यवाही का केली नाही. जुने मशीन दुरूस्त का केले नाही.गरीब लोकांना सुविधा देण्याचे बंद करीत आहोत काय ?

आरोग्य वैद्य.अधिकारी :रोटेशन पध्दतीने खर्च खरेदी करावयाचे होते बाकीच्या आरोग्य केंद्राची पण मागणी आहे.सर्वाची एकत्रित खरेदी प्रस्तावित करण्यात आली होती मध्यतंरी मी सुट्टीवर होते.ती संचिका माझ्याकडे नाही. संचिका तपासणी करून कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती :सदर संचिका मागवून घ्यावी आठ दिवसात कार्यवाही करावी.

श्री.अनिल जैस्वाल :सन 2006 मध्ये माझ्या वार्डात विहिरीवरून पाणी देणेसाठी पाईप लाईन केली. व 10 हजार लिटर क्षमतेच्या टाक्या बांधल्या आता त्या टाक्याचे व पाईप लाईनचे देखभाल दुरूस्ती समांतर एजन्सी करणार की महापालिका माहिती ध्यावी..

उपअभियंता (श्री फालक): विहिरीवरून पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. समांतर एजन्सी जायकवाडी व हर्सुल तलावातून होत असलेला पाणीपुरवठाची कामे करणार आहे.

श्री.अनिल जैस्वाल :या ठिकाणी टाकीवर तोटी बसविणे व सिमेंट कॉक्रेटींग करणे यासाठी 40 हजारचे अंदाजपत्रक तयार केले दीड महिण्यापासून पाठपुरावा करतो कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :संचिका बघुन तातडीने कार्यवाही करावी.

श्री.मीर हिदायत अली : समांतर एजन्सीला 5.25 कोटी रक्कम दिली जाते परंतु शहरात कोठेही काम करीत नाही अनेक ठिकाणी घाण पाणी येत आहे.

श्री.अनिल मकरिये :माझ्या वार्डात घाण पाणी येत आहे आजच्या वृत्तपत्रात आलेले आहे.समांतर एजन्सी काम करीत नाही त्याचा ठेका रद्य करावा.6 महिने झाले लाईन बंद आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :पाणीपट्टी 3050/-निश्‍चित केली कोणत्या सभेत मान्यता घेतली.वेळेवर पाणी येत नाही शुध्द पाणी नागरीकांना मिळत नाही.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.मीर हिदायत अली :पाणी वेळेवर देत नाही दुषित पाणी येते एजन्सीला पैसे तर वेळेवर दिले जात आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी आज उपस्थित नाही या संदर्भात सभापती दालनात अधिकारी व संबधीत एजन्सी धारक याची सयुक्त बैठक घेतली जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :अनेक रस्त्याची दुरावस्था झाली. ठेकेदाराने कामे बंद केली 40 कोटी रिलायन्स कंपनीने रस्ते खोदून ठेवले दुरूस्तीसाठी ही रक्कम दिली होती काम केलेले नाही.मागिल बैठकीत माहिती मागितली दिली नाही 110 कोटी खर्च झाल्याचे पत्रात नमुद केले आहे .त्यात एकात्मीक रस्ते, डिफर,शहरातील डांबरीकरण,दुरूस्ती केलेले व्हाईट टॉपींगचे रस्ते घेतले असा सन 2013-14 व 2014-15 चा गोषवारा दिला आहे. 40 कोटी रक्कम रिलायन्स व इतर कंपनीने दिली ती रस्त्यावरच खर्च केली का? कोणत्या एजन्सीला बील दिले.बील दिले असतांना त्या एजन्सीने कामे का थांबविली? गोलमाल खुलासा दिला बाजूच्या रकान्यात हेड दिले खर्च कसे झाले ते दिले समांतर जलवाहिनीवर 22.27 कोटी विद्युत देयक व वेतनभत्ते 11.30 कोटी असा 29.67 कोटी हा खर्च झाल्याचे दिले. 32.05 कोटी आलेले आहे 3 कोटी रूपये अधिक आहे. 40 कोटी उल्लेख केला नाही पेमेन्ट कुणाला केले. निविदा भरतांना किती दिवसात पेमेन्ट करणार होते रिलायन्स कंपनीने पैसे दिले ते जेथे रस्ते खोदतील तेथे काम करणार होते. रिलायन्सने जे खड्डे खोदलेले होते ते बुजविले नाही.

श्री.अनिल जैस्वाल :रिलायन्स कंपनीने एका रस्त्याची परवानगी घेतली त्याच अधारे 10 रस्ते खोदले.

श्री.फिरदोस फातेमा खान :40 कोटी मिळाले कोणती कामे केली हा खुलासा मागीतला होता 110 कोटीमध्ये केलेली कामाची माहिती दिली.दिशाभूल केली जात आहे.सन 2012 मध्ये एका रस्त्याचा विषय मांडला होता तो डिफर मध्ये येत आहे असे सांगण्यात आले.30 कोटी पेमेन्ट अदा केले.एकूण 13 रस्त्याची कामे डिफर वर होती 110 खर्च केले

तर तीन वर्षात माझ्या वार्डातील रस्त्याचे काम का केले नाही. माझ्या वार्डातील दुभाजकाचा प्रश्न अदयाप सुटला नाही तर 40 कोटी कोठे खर्च केले.रोषण गेट ते आझाद चौक रस्ताचे काम झाले नाही दुभाजकाचे काम का होत नाही दोन दिवसात कामे केले नाही तर मी नागरीक समवेत अदोंलन मोर्चे काढेल.या रस्त्याची समितीच्या माध्यमातून मा.सभापती आपण पाहणी करावी.

मा.सभापती : रिलायन्स व इतर कंपनीने रस्ता खोदले त्या दुरूस्तीसाठी 40 कोटी दिले होते ते कुठे खर्च केले सभागृहात सविस्तर खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी :दिनांक 18-11-2014 रोजीच्या स्थायी समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार दिनांक 25-11-2014 रोजी लेखाधिकरी यांनी अहवाल दिला त्यामध्ये 40 कोटीचा हिशोब स्वतंत्र दिला नाही.परंतु 40.40 कोटी रूपये आलेले होते ते महापालिकेचे उत्पन्न म्हणून समजले जाते.तत्कालीन आयुक्त यांनी प्राधान्याने रस्त्याची कामे करावी असे सुचित केले होते.जसजसे पैसे कमी पडतील तसतसे मा.आयुक्ताच्या मान्यतने पे्मेन्ट करण्यात आले.प्रामुख्याने यात पेमेन्ट बाबत उल्लेख नसला तरी त्याचा हिशोब आहे सन 2013-14 व 2014-15 या दोन वर्षात मध्ये ज्या लिडींग एजन्सीज एसएस कन्ट्रक्शन, अरोरा , आदिनाथ कन्ट्रक्शन ,ड्रीमलँड व इतर 9 एजन्सीज जे डांबरीकरणाची व रस्त्याची कामे करतात त्यात एस एस कन्ट्रक्शनला सन 2013-14 मध्ये 6.20 कोटी अदा केले.आदिनाथ कन्स्ट्रक्शनला सन 2013-14 व 14-15 मध्ये 6.47 कोटी, अरोरा कन्स्ट्रक्शनला 1.90 कोटी,ड्रीमलॅण्ड कन्स्ट्रक्शनला 1.31 कोटी, जीएनआय इन्फ्रा 22.47 कोटी, कालिका इजिनिअर्स 1.03 कोटी,मस्कट कन्ट्रक्शनला 7.77 कोटी ,एम. ए सिद्दीकी 3.98 कोटी,जेपी इंटरप्रायजेस 10.30 कोटी अशी एकूण 61.43 कोटी रक्कम अदा करण्यात आली.

मा.सभापती :ही रक्कम कोणत्या रस्त्याच्या बीलापोटी देण्यात आली ही माहिती अपेक्षीत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :आताच स.सदस्य श्री.जैस्वाल यांनी म्हटले 40 हजार रक्कमेची मंजुरीसाठी संचिका आयुक्ताकडे जाते.येथे 40 कोटीची रक्कम विविध एजन्सीला वाटप केली. जी माहिती दिली त्यात कोणत्या रस्त्यापोटी किती रक्कम दिली गेली याचा उल्लेख का केला नाही.

मुख्यलेखाधिकारी :सदर माहिती लेखाधिकारी यांनी दिली आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :स्थायी समितीत चर्चा झाली तेंव्हा एजन्सीसह रस्त्याची नावे देण्याचे आदेशीत केले.40 कोटी खर्च केले लेखी मिळावे एजन्सीला पैसे देण्यापुर्वी मा.आयुक्तांची मान्यता घेतली का? सन 2012-13 मधील 90 हजाराचे ड्रेनेजचे वार्षीक देखभाल दुरूस्तीचे 3 लक्षचे काम होते त्या एजन्सीला एक वर्षात फक्त 94 हजार दिले बील देतांना कोणते निकष लावले जातात .इतर कामाचे बील देतांना विविध अभिप्राय घेतो या बाबतीत टेक्नीकल विभागाला विश्वासात घेतले नाही. लेखा विभागाने पेमेंन्ट कुणाच्या मान्यतेने दिले.अधिकाराचा गैरवापर करून यात मोठा भ्रष्टाचार झाला.रोषणगेट ते किराडपुरा आझाद चौकापर्यतच्या रस्त्याचे काम 6 वर्षापासून होत नाही 1.46 ोटी भुसंपादनासाठी देण्यात आले त्या 40 कोटीतून ज्यांना पेमेंन्ट केले तीच एजन्सी या रस्त्याचे काम करत असेल तर काम का होत नाही. मनमानी कारभार करणार असेल तर हे योग्य नाही 40 कोटी रूपये कुणाच्या आदेशाने अदा केले उदा. 50 कामाचे एम. बी आल्या कशा प्रकारे प्राधान्यक्रम लावला जातो स्पष्ट

करावे. ज्यांनी पेमेन्ट केले त्या एजन्सीला प्रलंबीत असलेली कामे करण्यास लावावे. पेमेन्ट देण्यावर कन्ट्रोल करावे.

मा.सभापती :कोणत्या एजन्सीने कोणत्या रस्त्याचे कामे केली व त्या एजन्सीला किती पेमेंन्ट देण्यात आले रक्कमेसह व रस्त्याच्या यादीसह सर्व सदस्यांना लेखी माहिती संबधीत विभागाने दयावी.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:माझ्या वार्डात रस्त्यावर किती खर्च केले.माहिती देण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :पाणीपुरवठा व रस्त्याच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी आपल्या दालनात बैठक बोलवावी व संबधीत अधिकारी यांना बैठकीत बोलवून वार्डातील विकास कामे मार्गी लावावे स.सदस्यांना बैठकीला बोलवावे.अशी अपेक्षा करतो.

श्री.जहागींर खान :प्रत्येक वेळी खुलासा देवू अशी उत्तरे मिळातात तीन महिणे शिल्लक आहे 5 वर्षात अपेक्षीत कामे झाली नाही. 40 कोटी बील अदा केले तरी रस्त्याची कामे होत नाही. रस्त्यात मोठे खड्डे पडले नागरीकांना कंबरेचा,मानेचा,पाठीचे आजार होत आहे. कामे होत नाही जबाबदारी कुणी घेत नाही.

श्रीमती प्रिती तोतला :पानदरिबा,औरगपूरा व इतर ठिकाणचे रस्ते रूदींकरण केले. अनेकांची रस्त्यासाठी जागा दिल्या. परंतु साइडचे फुटपॉथ करण्यात आले नाही. पेमेंन्ट दिले तर त्या एजन्सीज काम का करीत नाही.

श्री.मीर हिदायत अली :लाड समिती अंतर्गत सोनू रामकुमार घुसर यांचे संदर्भात प्रश्न उपस्थित केला खुलासा देणार होते संचिका मागितली का ?

आस्थापना अधिकारी-2 :मनपामध्ये ओमप्रकाश रूपचंद घुसर नावाचे कर्मचारी स्वीपर म्हणून कार्यरत होते.त्याचे दिं 5-12-2006 निधन झाले.

श्री.काशिनाथ कोकाटे :मनपाच्या जागा ,शॉप्स ई पोलीस विभाग, एमएसईबी व इतर लोकांना भाडेपट्टयाने दिल्या उत्पन्न येणे बाकी आहे ते वसुल करावे.रॉक्सी सिनेमा जवळील शॉप , लोकमान्य टिळक हॉल भाडयाने देण्यात आले काही लोकानी कोर्ट प्रकरण केले त्यामूळे उत्पन्न येत नाही .ते लोक पैसे देण्यास तयार असतील तर त्यांचेशी लेखी करार करून निर्णय घ्यावा 2-3 कोटी उत्पन्न येईल. सिल्लेखाना भागातील शॉपींगमध्ये 36 दुकाने आहे 16 दुकानात व्यवसाय होतो तेथील दुकानदार पैसे देत नाही या बाबतीतही निर्णय घ्यावा कमर्शीयल टॅक्सेसची प्रकरणे निकाली काढावी.वार्ड अधिकारी,वसुली संदर्भात अधिकारी यांना बैठकील बोलवावे डोअर टू डोअर वसुली करण्याचे आदेशीत करावे.टारगेट पुर्ण करण्यात यावे. अनधिकृत वसाहतीत ऑलरेडी सर्व सुविधा दिल्या जातात. अशा 65 वसाहतीतूनही टॅक्स आकारून वसूली करावी. जे भरतात त्यांचेवर कराचा बोजा टाकणे योग्य नाही.

मा.सभापती :उत्पन्न वाढविण्या संदर्भात तसेच रस्त्याची कामे व पाणीपुरवठा संदर्भात 2-3 दिवसात बैठक आयोजित केली जाईल.त्या बैठकीत योग्य निर्णय सुचना केल्या जातील.

श्री.मीर हिदायत अली :लाड समितीच्या निकषानुसार दिनांक 17-7-2014 मध्ये एका कर्मचा-यास नियुक्ती दिली ते लाड समितीच्या निकषानुसार पात्र आहेत का ?

आस्थापना अधिकारी-1 : ओमप्रकाश रूपचंद घुसर नावाचे कर्मचारी स्वीपर म्हणून कार्यरत होते.त्याचे 5-12-2006 ला निधन झाले.त्यानंतर त्यांची पत्नी यांनी दिनांक 13-2-2007 मध्ये अर्ज दिला की पतीच्या जागेवर नोकरी दयावी. सन 2009 मध्ये पत्नीचेही निधन झाले त्यानंतर सोनु रामकुमार घुसर यांनी 2013 ला मी त्यांचा पुतण्या आहे ,त्यांचा

वारस आहे मला नोकरी दयावी असा अर्ज दिला त्याअनुषंगाने बैठक होऊन संबधीतास नियुक्ती दिली आहे.

श्री.मीर हिदायत अली :लाड समितीचे नियम काय आहे कोणास वारस म्हणुन नोकरी देता येते.

आस्थापना अधिकारी-1 :लाड समितीचे कॅडर असे की पती असेल तर पत्नी, पत्नी असेल तर पती,मुलगा किंवा मुलगी हे नसतील तर सुन किंवा जावई हे नसतील तर संबधीताचे जवळचे नातेवाईक हेही नसतील तर त्या व्यक्तीने ज्या व्यक्तीला वारस केले ते व्यक्ती, यांना नियुक्ती देता येते.

श्री.काशिनाथ कोकाटे :त्या व्यक्तीला वारस असतांना दुस-या व्यक्तीस नियुक्ती दिली योग्य वाटत नाही?

आस्थापना अधिकारी-1 :त्या व्यक्तीच्या चारही मुलाने लिहून दिले की या व्यक्तीला वारस करतो.

श्री.मीर हिदायत अली :एक वर्षात 218 कर्मचा-यांना नियुक्ती दिली.ज्यांची 20 वर्ष सेवा झाली त्यांचेकडे एंजन्ट जातात रक्कम ठरवितात.त्या व्यक्तीला स्वेच्छा निवृत्ती घ्यायला लावतात ज्याला नियुक्ती दयायची त्यांचेकडून रक्कम घेवून एजन्ट अर्धी व सेवेत असणारे कर्मचारी अर्धी रक्कम ठेवून घेतात.नोकरीवर असणारास पेन्शन लागू होते जो वारस नाही अशी एक नवीन व्यक्ती नोकरीवर येते.निधन झाल्यानंतर किती दिवसात अर्ज आला पाहिजे.

आस्थापना अधिकारी-1 : एक वर्षाच्या आत अर्ज आला पाहिजे.संबधीताची पत्नी हिने 13/2/2007 ला अर्ज केला. वारसादारांनी 2009 मध्ये व 27-7-2009 ला अर्ज केल्याचे दाखवले आहे.

श्री.मीर हिदायत अली :शासन नियमानुसार एक वर्षाच्या आत अर्ज केला तर नोकरीवर हक्कदार होऊ शकतात.सबधीतांनी दोन वर्षानंतर अर्ज दिल्यानंतरही नियुक्ती कोणत्या नियमानुसार दिली.

मा.सभापती :लाड समितीच्या निकषानुसार नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याची मुख्यलेखा परीक्षक चौकशी करून अहवाल सभेत सादर करतील त्यानंतर योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.मीर हिदायत अली :आताच म्हटले की नातेवाईक असेल तर नोकरी देवू शकतो. वैजंयताबाई शिंदे सेवेत होत्या सेवानिवृत्ती घेतली त्यांना अपत्य नव्हती .त्यांचे जागेवर सय्यद अकबर नावाचे व्यक्तीस नोकरी दिली हे व्यक्ती वारस होऊ शकतात काय याचा खुलासा करावा.

आस्थापना अधिकारी-1 :लाड समितीचे प्रकरण असेल तर जो लाभार्थी आहे तो रस्त्यावर जाणा-या व्यक्तीचे डोक्यावर हात ठेवून सांगू शकतो हा माझा वारसदार आहे. नियमात तशी तरतुद आहे.

श्री.मीर हिदायत अली :लाड समितीचा लोक चुकीचा फायदा घेत आहे.218 लोकांना एक वर्षात नियुक्ती दिली. बॉण्ड पेपर लिहून घेतले जाते सोबत ते शपथपत्र आहेत सर्व तपासणी करावी.

श्री.जगदीश सिध्द :लाड समितीचे जेवढे प्रकरण असतील सर्व कागदपत्राची तपासणी करावी. अहवाल मागवावा.

मा.सभापती :लाडसमिती अंतर्गत नेमणुक केलेल्या कर्मचाऱ्याच्या कागदपत्राची मुख्यलेखा परीक्षक यांनी तपासणी करून चौकशी अहवाल या सभागृहासमोर सादर करावा.

श्रीमती प्रिती तोतला :1124 कर्मचा-याचा प्रश्न उपस्थित केला या बैठकीत खुलासा देणार होते. त्या कर्मचा-यांना ज्या सुविधा दयायचा त्या दिल्या जात नाही.

आस्थापना अधिकारी-2 :1124 मधील कर्मचा-यावा सेवापट देण्याचे आदेशीत केले होते त्यानुसार विभागातर्फे 559 कर्मचारी आहेत 25 कर्मचा-यांचे निधन झाले 20 कर्मचारी यांना सेवेतून काढलेले आहे 14 कर्मचा-याचे प्रमाणपत्र तपासणी अतर्गत होते असे एकूण 500 कर्मचा-या साठी 2011 साली एक कमेटी स्थापन केली आहे.या कमेटीने या कर्मचा-याचे ज्यांनी प्रथम नियुक्तीच्या वेळेस मेडीकल प्रमाणपत्र दिले असेल,लेखा विभागाच्या यादीत नाव नाही ज्याची टीसी मध्ये खाडाखोड आहे जन्म तारखेत किंवा नावात बदल आहे. हे सर्व कमेटीने तपासणी करून अहवाल दयायचा होता तो दिला आहे.त्यात त्यांनी असे म्हटले की ज्या कर्मचा-यांच्या नावात तफावत आहे जन्म तारखेत बदल आहे अशांची दोन वेतनवाढ कायमस्वरूपी थांबवून सेवेत कायम करण्यात यावे ज्यांचे नावात बदल असेल त्यांना आहे त्याच नावाने सेवापट दयावे नंतर त्याचेकडून स्वतंत्र शपथपत्र घेवून नावात दुरूस्ती करावी.यानुसार संचिका तयार करून वरिष्ठाकडे सादर केली आहे.

श्री.मीर हिदायत अली :तीन दिवसात कार्यवाही करावी रूलींग दिले अदयाप कार्यवाही केली नाही.

आस्थापना अधिकारी-2 :सदर संचिका उपआयुक्त (म)यांचेकडे पाठविली होती.त्यांची स्वाक्षरी होऊन मा.आयुक्ताकडे पाठविली आहे.

मा.सभापती :मा.अति.आयुक्त येथे उपस्थित आहे त्यांनी मा.आयुक्तांशी या संदर्भात चर्चा करून संचिका निकाली काढावी.

श्रीमती उर्मीला चित्ते :वार्ड ब अधिकारी कार्यालयात उपस्थित नसतात.

अति.आयुक्त :या बैठकीला सर्वानी उपस्थित रहावे असे परिपत्रक काढले आहे पोलीस केस संदर्भात कोर्ट प्रकरण होते त्यामूळे उपस्थित नाही.

श्रीमती प्रिती तोतला :वार्ड अधिकारी श्रीमती प्रियका केसरकर प्रत्येक बैठकीला अनुपस्थित असतात~

मा.सभापती :वार्ड ब अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नसतील त्यांच्या वारवांर तक्रारी येत असतील तर त्यांची दुसरीकडे बदली करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :सुरक्षा रक्षक, शिक्षकाची वेतनश्रेणीवाढ तसेच 1124 कर्मचारी याचे सेवा पट देण्याचा विषय असेल आस्थापना अधिकारी -1,2, उपआयुक्त यांचेकडून खुलासा घ्यावा शिक्षकाचे दोन वर्षापासून वेतनवाढ केली नाही.सुरक्षा रक्षक यांना वेतनश्रेणी वाढ मिळते त्यास शासनाची मंजूरी घ्यायची आहे. ते कर्मचारी निवृत्त होता त्यावेळी ते वाढीव श्रेणी दिलेल्या फरकाची रक्कम कपात केली जाते.शासनाकडून याचा पाठपुरावा करावा.सेवानिवृत्त कर्मचारी निवृत्ती वेतन लागू होण्यासाठी विविध विभागात चकरा मारतात नियमानुसार कार्यवाही होत नाही आस्थापना विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.जो कर्मचारी निवृत्त होईल त्याच दिवशी त्याला त्याचे सर्व आर्थीक फायदे मिळावेत.

श्री.मीर हिदायत अली :आरसीएच टप्पा क्र-2 मधील 9 डॉक्टर पैकी 3 डॉक्टर, 49 नर्स पैकी 24 नर्स यांनी पगार होत नाही म्हणून नौकरी सोडली चार महिण्याचे वेतन थकलेले आहे. तसेच शिक्षक कर्मचारी यांना पगार वेळेवर दिला जात नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी :24 डॉक्टर नोकरी सोडून गेलेले नाही चुकीची माहिती आहे.त्यांना 15000/- इतका कमी पगार मिळतो.आपले कडे भरती त्यात डॉक्टरांना 40 हजार पेमेंन्ट आहे.वेतनामध्ये तफावत होती जे कॉन्ट्रक्ट बेसवर डॉक्टर होते ते सोडून गेलेले आहे.

मा.सभापती :नवीन डॉक्टर भरती करू शकतो.

आरोग्य वैद्य.अधिकारी : 76 नर्सेस भरती केले. आठ आरोग्य केंद्रासाठी डॉक्टरांची मंजूरी आली आहे भरती प्रक्रिया समिती तर्फे सुरू करण्यात आली आहे.सात नवीन डॉक्टर घेतले जातील.

श्री.मीर हिदायत अली :450-500 शिक्षक मनपाच्या शाळेत मुलांना शिकवितात. शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज उपआयुक्ताकडे दिला या पदावर कायमस्वरूपी अधिकारी नेमावे 8 वी ते 10 पर्यंत वर्ग सुरू केले तेथील  तासीका बेसवर असलेले शिक्षक पगार होत नाही म्हणून काम सोडून निघून गेले यामुळे मुलाचे शैक्षणिक नुकसान होत आहे. किराडपूरा, शहाबाजार शाळेत शिक्षक नाही.यासाठी प्रशासनाला आदेशीत करावे.

मा.सभापती :या बाबतीत प्रशासनाने ताबडतोब तासिका बेस वरील शिक्षकाची भरती करावी तसेच जे कर्मचारी सेवानिवृत्त होणार त्यांना सेवानिवृत्तीचा पुर्ण आर्थीक फायदे होण्यासाठी सहा महिणे अगोदर पासूनच कार्यवाही प्रशासनाने सुरू करावी.

श्री.मीर हिदायत अली :अनधिकृत होर्डिग्ज बाबत काय कार्यवाही केली.

मालमत्ता अधिकारी :शहरात 348 होर्डीग्ज आहेत 50 होर्डीग्ज बाबत नव्याने प्रस्ताव आलेले आहेत अनधिकृत होर्डिग्ज काढण्याचे आदेशीत होते त्यानुसार 82 होर्डीग्ज काढले आहे ही कार्यवाही प्रशासकीय विभागाने करावे असे आदेश असतांना मालमत्ता विभागाने जे उपलब्ध कर्मचारी आहे.पोलीस कर्मचारी नसतांना कार्यवाही केली आहे.कार्यवाही चालू आहे चार लोकांवर गुन्हे दाखल केले.

मा.सभापती :वाहणे भाडयाने घ्यावे कर्मचारी मागवावे कार्यवाही करावी.

सहा.संचालक (न.र) :मालमत्ता विभागाने कार्यवाही सुरू केली. जास्तीचे कर्मचारी घेण्यासाठी संचिका मा.आयुक्ताकडे आहे वाहन, पोलीस कर्मचारी ई व्यवस्था सध्या प्रशासकीय अधिकारी यांचेकडे आहे.होर्डीग्ज काढण्याची कार्यवाही चालू राहिल. कर्मचारी मिळेल त्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

प्रशासकीय अधिकारी :पोलीस कर्मचारी दिलेले आहे ते मनपाच्या हद्दी बाहेर काम करीत नाही 2-3 कर्मचारी फक्त सातारा देवळाई येथे दिलेले आहे.मालमत्ता विभागात इमारत निरीक्षक व 30-40 कर्मचारी आहेत प्रशासकीय विभागात अगोदरच कर्मचारी कमी आहे. मालमत्ता विभागास पोलीस कर्मचारी पाहिजे तेंव्हा उपलब्ध करून दिले जातात.

मा.सभापती :प्रशासकीय ,मालमत्ता विभाग यानी समन्वय ठेवून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.जेंव्हा मागणी केली तेंव्हा सातारा देवळाई येथे कर्मचारी गेल्याचे सांगिण्यात येते हे बरोबर नाही.

प्रशासकीय अधिकारी :नियमीत कर्मचारी सातारा देवळाई येथे काम करीत नाही.

श्री.मीर हिदायत अली :कर्मचारी असतांना  अधिकारी काम का करीत नाही.

मालमत्ता अधिकारी :इमारत निरीक्षक आहे .एक ट्रेसर कर्मचारी त्यांचेकडे परवानगी देणे, लीज वर दिलेल्या जागा , हॉलच्या जागेचे काम करणे, ई. कामे आहे. 30-40 जे कर्मचारी आहे ते हॉलवर,नाथ सुपर मार्केट, नाटयगृह वॉचमन म्हणून आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :मनपाच्या इमारती किती ,हॉल किती , सुरक्षा म्हणुन किती कर्मचारी कुठे नेमले आहे.नाथ सुपर मार्केट वर कर्मचारी ठेवण्याची गरज आहे का ?

मालमत्ता अधिकारी : कर्मचारी साफसफाई करतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :वार्ड कार्यालया मार्फत कर्मचारी देवून तेथे साफसफाई करायला पाहिजे.स्वतंत्र कर्मचारी देवू नये. यादी तपासून बघावी.40 कर्मचारी कशाचे रक्षण करतात माहिती

दयावी.तसेच दुसरा प्रश्न असा की 2006 मध्ये सिडको हस्तांतर झाले.करारनामा करतांना सिडकोमध्ये बांधकाम करतांना किंवा बदल करावयाचा झाल्यास सिडकोकडून नाहरकत प्रमाणपत्र घेतले पाहिजे.इमारतीचे बांधकामासाठी महापालिकेच्या वतीने एनओसी दिली जाते. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुन्हा सिडकोचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते हे नियमाने आहे का? ही नोंद कुठे ही नाही. एखादया सिडकोच्या मालमत्तेवर कर्ज असेल तर सिडकोचें नाहरकत प्रमाण पत्र घ्यावे असे आहे.3 वर्ष परवानगी दिली जात नाही पुन्हा भोगवटा प्रमाणपत्रासाठी चार्ज लावणार हा त्या नागरीकांस भुर्दंड पडतो आहे एका मिळकतीचे एका वेळेस नाहकरत प्रमाणपत्र आले असेल तर दुस-यांदा मागवू नये.

सहा.संचालक(न.र) :एमआरटीपी ॲक्ट नुसार सिडको हे स्पेशल प्लँनीग अथॉरीटी करण्यात आली होती.हस्तांतर जेंव्हा झाले त्यावेळी एनओसी सिडकोची घ्यावी अशी अट टाकली होती.त्यानुसार बांधकाम परवानगी घेतांना आपण एनओसी घेतो सिकडो काही चार्जेस लावतात व एनओसी देतात त्याच धरतीवर भोगवटा प्रमाणपत्रासाठी एनओसी घेतो त्यावेळी सिडकोची एनओसी देण्यात येते जो मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :भोगवटा प्रमाणपत्र घेताना एनओसी घ्यावी असे करारनाम्यात नाही. जे ठरले त्याप्रमाणे कार्यवाही करावी.नागरीकाची सिडको पैसे वसुल करीत आहे .

सहा.संचालक (न.र) :या सदर्भात संचिका मा.आयुक्ताकडे सादर केली जाईल सन 2006 पासून वसूल करीत आहोत एकदम बंद करता येणार नाही मान्यता घ्यावी लागेल.

मा.सभापती : नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.सहा.संचालक नगररचना यांनी मा.आयुक्तांशी चर्चा करून योग्य निर्णय लवकरात लवकर घ्यावा.मालमत्ताची थकबाकी किती आहे.

मालमत्ता अधिकारी :सन 14-15 साठी 5 कोटीचे टारगेट होते 1.93 कोटी वसुल झाले.

मा.सभापती :पैठणगेट येथील जागा वाहतूक पोलीस शाखेस दिली आहे. किती भाडे वसुल केले.पीर बाजार पोलीस चौकीचे किती भाडे वसुल केले.

मालमत्ता अधिकारी :आर आर नुसार भाडेदर लावलेले आहे. त्यांचे म्हणणे असे की पीडब्ल्युडी विभागाकडून भाडेदर निश्चिती केल्यानंतर भाडे दिले जाईल यासाठी पत्रव्यवहार चालू आहे.पीर बाजार तसेच एन-6 पोलीस चौकी असे तीन चौकीसाठी जागा दिली आहे.

मा.सभापती :पन्नालालनगर भागात महावितरणास जागा दिली किती थकबाकी आहे.

मालमत्ता अधिकारी :26 लाख थकबाकी काढली आहे त्यातील 16 लक्ष त्यांनी भरणा केले आहे.

मा.सभापती :पैठण गेट पोलीस चौकीचे 10 लक्ष व पीरबाजार पोलीस स्टेशनचे 17 लक्ष येणे आहे. पेपरला बातम्या येतात आपण बघत नाही.वसुली केंव्हा करणार होर्डीग्ज बाबत काय कार्यवाही केली. ज्या लिगल आहेत त्याची वसुली झाली का ?

मालमत्ता अधिकारी :अनधिकृत होर्डीग्ज धारकास नोटीसा दिल्या आहे. दर निश्चिती बाबत संचिका कार्यवाहीस्तव आहे.

मा.सभापती :पुढील बैठकीपर्यत वसुलीत वाढ करावी. नसता कार्यवाही करण्यात येईल.

**विषय क्र. 80 :**

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.7373/2014 दिनांक 22/09/2014 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.विजय खंडुजी वाघमारे, कनिष्ठ लिपीक तथा तत्कालीन रोखपाल, वॉर्ड-फ

कार्यालय (सध्या सेवेतून बडतर्फ) मनपा, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/ 2007/1378, दिनांक 22/10/2007 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून बडतर्फ केल्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**सोबत :-**

01. विधी सल्लागार यांचे पत्र जा.क्र.मनपा/विधी/1196/2014, दिनांक 17/10/2014.
02. रिट पिटीशन व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची छायांकित प्रत.
03. संबंधीताने स्थायी समितीकडे दाखल केलेले अपीलाची प्रत.
04. संबंधीतास बडतर्फ करण्यांत आलेल्या स्थायी समितीचा ठराव क्र.100, दिनांक 04/09/2007 ची छायांकित प्रत.
05. बडतर्फी आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/ 2007/1378, दिनांक 22/10/2007 ची छायांकित प्रत.
06. रिट याचिका क्र.7373/2014, च्या अनुषंगाने कार्यालयीन टिपणी.

**चर्चा :**

मा.सभापती :स्थायी समिती समोर सादर केलेले अपील संबधीत प्रशासनाने खुलासा करावा.

आस्थापना अधिकारी-1 : विजय खंडुजी वाघमारे यांचे अपीलावर निर्णय घेणेसाठी विषयपत्रिकेवर विषय आहे.विजय खंडुजी वाघमारे हे वार्ड फ मध्ये कनिष्ठ लिपीक असतांना ते रोखपाल म्हणून काम करीत होते.त्यांनी विविध करांच्या माध्यमातून रूपये 6,27,061/- एवढया रक्कमेचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले त्यानुसार त्यांचेवर जवाहर नगर पोलिस स्टेशनला गुन्हाही नोंदविलेला होता.त्यांची विभागीय चौकशी केली त्यातही ते दोषी आढळून आले.त्यामुळे प्रशासनाने मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवल्याप्रमाणे स्थायी समितीने त्यांना बडतर्फ करण्याचा ठराव मंजूर केला होता त्यानुसार त्यांना प्रशासनाने बडतर्फ केलेले आहे. त्यांनी त्या विरोधात स्थायी समितीकडे अपील केले आहे.विहित मुदतीत म्हणजे एक महिण्याच्या आत त्यांनी अपील करणे अपेक्षीत होते.तसे झालेले नाही तसे सविस्तर आपल्या निदर्शनास आणून दिलेल आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :सदर कर्मचारी संदर्भात यापुर्वी स्थायी समितीने त्यांना बडतर्फ करण्यात यावे म्हणून निर्णय घेतला आहे. यानंतर हे वरिष्ठ सभागृहात यायला पाहिजे होते.असे असतांना हा ठराव का समोर आला.

आस्थापना अधिकारी-1 : श्री.विजय वाघमारे यांनी स्थायी समिती समोर जे अपील केले होते त्यावर मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते की, स्थायी समितीने त्यांचे अपील असेल तर त्यावर 6 महिन्यात निर्णय घ्यावा. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव आहे. टिप्पणी मध्ये निदर्शनास आणुन दिले की स्थायी समितीची वरिष्ठ प्राधिकारी सर्वसाधारण सभा आहे.तसे अपील त्यांनी करायला पाहिजे होते परंतु तसे झाले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :मा.न्यायालयाचे मंजूर करावे असे आदेश असेल तर अपील मंजूर करावे परंतु यावर विचार करावा असे म्हटले असेल तर वरिष्ठ सभागृहासमोर हे यायला पाहिजे.जर या सभागृहाने म्हटले आहे की त्यांनी अपहार केला म्हणून त्यांना बडतर्फ करीत आहोत.हे प्रकरण वरिष्ठ सभागृहात हे अपील केले पाहिजे असे अपेक्षीत राहिल.मा.न्यायालयाचा असा आदेश आहे का त्यांना कामावर घ्यावे.

आस्थापना अधिकारी-1 :नाही, असा आदेश नाही,मा.न्यायालयाचे आदेश असे की, In case the appeal filed by the petitioner before the Standing Committee is pending,the Standing Committee shall decide it on its own

merits as per law expeditiously and preferably within a period of six months from today.The writ petition is disposed of No costs.स्थायी समितीने ऑलरेडी निर्णय घेतलेला आहे त्यानुसार संबधीतावर कार्यवाही केली आहे.

विधी सल्लागार :श्री.विजय खंडुजी वाघमारे यांनी जे स्थायी समिती समोर अपील केले होते.त्यानंतर त्यांनी माझ्या अपीलावर निर्णय व्हावा अशी रिट याचिका मा.उच्चन्यायालयात दाखल केली होती.मा.न्यायालयाने एवढेच म्हटले आहे की संबधीताने जे अपील दाखल केले असेल त्यांवर नियमाप्रमाणे निर्णय घ्यावा त्यांना घ्यावच असे नाही.हे अपील दाखल होण्यापुर्वी स्थायी समितीसमोर अपील आलेले होते त्यावर स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार संबधीतावर बडतर्फीची कार्यवाही कायदयाच्या तरतुदीनुसार केलेली आहे. खरे म्हणजे हे अपील येथे मेन्टेनेबल नाही व दाखल करून घेणे योग्य नाही.जे काही करायचे ते वरिष्ठ सभागृहासमोर होईल असे अभिप्रेत आहे.

श्री.मीर हिदायत अली :संबधीत कर्मचारी यांनी 6.27 लक्षचा अपहार केला. त्यांनी गुन्हा केलेला आहे. त्याची शिक्षा त्यांना मिळाली आहे.

मा.सभापती : संबधीत कर्मचाऱ्याने बडतर्फ करण्याचा आदेश कळविल्यापासून विहीत मुदतीत म्हणजेच एक महिन्याचे आत वरीष्ठ प्राधिका-याकडे अपिल सादर करणे आवश्यक होते. त्यांनी स्थायी समितीकडे 2013 मध्ये अपील केल्याचे दिसून येते म्हणून सदरचे अपील मेन्टेनेबल नाही.स्थायी समितीने ठराव क्र.100 दिनांक 4-9-2007 नुसार घेतलेला निर्णय कायम ठेवण्यांत येतो. सबब सदरील अपील निकाली काढण्यात येते. संबधीतास या बाबत अवगत करावे.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, श्री.विजय खंडुजी वाघमारे, कनिष्ठ लिपीक तथा तत्कालीन रोखपाल, वॉर्ड-फ कार्यालय (सध्या सेवेतून बडतर्फ) मनपा, औरंगाबाद यांनी बडतर्फ करण्याचा आदेश कळविल्यापासून विहीत मुदतीत म्हणजेच एक महिन्याचे आत वरीष्ठ प्राधिकाऱ्याकडे अपिल सादर करणे आवश्यक होते, परंतु संबंधीताने स्थायी समितीकडे 2013 मध्ये अपील केल्याचे दिसून येते. सदरचे अपील मेन्टेनेबल नाही. स्थायी समितीने ठराव क्र.100 दिनांक 4-9-2007 नुसार घेतलेला निर्णय कायम ठेवण्यांत येतो. सबब सदरील अपील निकाली काढण्यात येते. संबधीतास या बाबत अवगत करावे.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद